# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**B**

SPANDAN Career Institute *The way of success...* SINCE 2008

**प्रश्नपुस्तिका क्र.**

**BOOKLET No.** **GS2022**

**Total Que. : 100**
**Marks : 100**
**Time : 60 min**

**Mob. No. 9923262977**

**Date :16/01/2022**

**संयुक्त (पूर्व) सराव परिक्षा - 2022**


**विषय : — सामान्य अध्ययन [002]**

**पेपर क्र. (२)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. $\dfrac{25+[16-\{12+(4+12-8)\}]}{7+\{4-(6-2)\}}=?$

१) ४ २) ३ ३) २ ४) ०

२. एका गावाची लोकसंख्या सध्या २०,००० आहे. ती दरवर्षी १०% ने कमी होते. तर ३ वर्षानंतर त्या गावाची लोकसंख्या किती असेल ?

१) १५३८० २) १५५८० ३) १४५८० ४) १४३८०

३. एका विद्यार्थ्याला तीन विषयात ७५%, ८०% आणि ८५% असे गुण मिळाले. जर दुसऱ्या एका विषयाचे गुण त्यात मिळविले तर त्याच्या सरासरी गुणांची टक्केवारी पुढीलपैकी कोणत्या टक्केवारीपेक्षा कमी नाही ?

१) ६०% २) ६५% ३) ८०% ४) ९०%

४. एक घडयाळ ५७५ रूपयास विकल्याने शेकडा १५ नफा होतो. तर घडयाळाची मूल किमत किती ?

१) ५६० रू. २) ६५० रू. ३) ५०० रू. ४) ५९० रू.

५. २०० मी. लांबीची एक आगगाडी २४० लांबीच्या प्लॅटफॉर्मला २२ सेकंदात ओलांडते तर त्या गाडीचा ताशी वेग किती किमी असेल ?

१) ६० २) ४८ ३) ५३ ४) यापेक्षा वेगळे

६. १ जानेवारी १९९२ ला कोणता दिवस येतो ?

१) सोमवार २) मंगळवार ३) बुधवार ४) गुरूवार


७. ५.३० आणि ६ च्या दरम्यान तास काटा व मिनिट काटा ५ वाजून .................... मिनिटांनी काटकोन करतात

१) $45\frac{3}{11}$ २) $43\frac{7}{11}$ ३) ४० ४) ४५

८. $\left(\frac{4}{13}\times\frac{3}{8}+\frac{5}{13}\right)\div\left(\frac{3}{4}-\frac{2}{4}\right)=$ किती ?

१) २/१ २) ४/१ ३) २ ४) यापैकी एकही नाही

९. खालील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




१) ९० २) ४५ ३) ६० ४) ८५


१०. सहा मुले वर्तुळाच्या केंद्राकडे तोंड करून वर्तुळाकार बसले आहेत. अरूण दिपकच्या उजवीकडे आहे पण संदेशच्या डावीकडे नाही. चंदर हा प्रकाश व संदेशच्या मध्ये आहे. संदेश विशालच्या डाव्या बाजूस आहे. जर संदेश व दिपक आपल्या जागांची अदलाबदल केली तर विशाल व चंदरच्या मध्ये कोण येईल ?

१) विशाल २) संदेश ३) दिपक ४) प्रकाश

११. प्रभाकर पश्चिमेकडे तोंड करून उभा आहे. काही वेळाने तो १८०° कोनात घडयाळाच्या काटयाच्या दिशेने व पुन्हा ४५° कोनात घडयाळाच्या काटयाच्या उलटया दिशेने वळाला पुन्हा काही वेळाने तो २२५° कोनात घडयाळाच्या काटयाच्या उलटया दिशेने वळाला तर त्याचे तोंड आता कोणत्या दिशेस असेल ?

१) दक्षिण २) नैऋत्य ३) पश्चिम ४) आग्नेय

१२. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




१)७४ २) ७६ ३) ७५ ४) ७८

१३. रिना व तिची आई यांच्या वयाचे गुणोत्तर १ : ५ असून त्यांच्या वयांची बेरीज ३६ वर्षे आहे. तर रिनाची आजचे वय किती ?

१) ३० २) २० ३) ३६ ४) ४०

१४. २६, २९, ३६, ३९, ४६, ४९, ५६, ?

१) २६ २) ३६ ३) ५९ ४) ४९

१५. तर्क १) सर्व मंत्री हे संत्री आहे
२) एकही संत्री मुख्यमंत्री नाही
३) सर्व मुख्यमंत्री हे आमदार आहेत

अनुमान: अ) काही आमदार हे संत्री आहेत
ब) एकही मुख्यमंत्री मंत्री नाही
क) सर्व आमदार हे मुख्यमंत्री आहेत

वरीलपैकी सत्य अनुमान निवडा

www.spandancareers.org

१) फक्त क सत्य २) फक्त ब सत्य ३) फक्त अ व ब सत्य ४) यापैकी एकही नाही

१६. खालील विधाने विचारात घ्या

अ) बहुतांश हत्ती सज्जन पुरूष आहे. ब) काही सज्जन पुरूष तलाव आहे

i) काही हत्ती तलाव आहे ii) काही तलाव हत्ती आहे

अनुमान

१) अनुमान i बरोबर २) अनुमान ii बरोबर ३) अनुमान i व ii बरोबर ४) अनुमान i व ii चुक

१७. जीवनसत्व (Vitamin) आणि आजार (Disease) यांच्याशी संबंधित खालीलपैकी कोणती जोडी चूक आहे ?

१) जीवनसत्व 'अ' – रातांधळेपण २) जीवनसत्व 'ब' – बेरीबेरी

३) जीवनसत्व 'क' – स्कर्व्ही ४) जीवनसत्व 'ई' – मनोविकृती (Psychosis)

१८. खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

१) अणुकेंद्रकामध्ये केवळ इलेक्ट्रॉन असतात २) अणूकेंद्रकामध्ये इलेक्ट्रॉन आणि प्रोट्रॉन दोन्ही असतात

३) अणूकेंद्रकामध्ये फक्त न्यूट्रॉन असतात ४) अणूकेंद्रकामध्ये प्रोट्रॉन आणि न्यूट्रॉन दोन्ही असू शकतात

१९. खालील विधाने विचारात घेऊन योग्य पर्याय निवडा

अ) आधुनिक आवर्तसारणीमध्ये ७ आवर्त आहेत (Periods)

ब) आधुनिक आवर्तसारणीमध्ये १८ स्तंभ आहेत (Groups)

क) आवर्तीसारणीचा विस्तारीत नमुना Range आणि Werner यांनी बनवला

१) फक्त अ योग्य २) ब आणि क योग्य ३) अ आणि ब योग्य ४) अ, ब आणि क योग्य

२०. एखादे बीज अंकुरणासाठी खालीलपैकी कोणते तीन तत्वे सर्वाधिक महत्वाची आहेत ?

१) माती, पाणी, ऑक्सिजन २) पाणी, योग्य तापमान, ऑक्सिजन

३) योग्य तापमान, ऑक्सिजन, कार्बनडाय ऑक्साईड ४) तापमान, ऑक्सिजन, प्रकाश

२१. योग्य जोडया लावा

| किरणोत्सारी समस्थानिके | उपयोग |
|---|---|
| १) युरेनियम | i) कर्करोगावर उपचार |
| २) कोबाल्ट | ii) गॉयटरवरील उपचार |
| ३) आयोडीन | iii) अश्मांचे वय |
| ४) कार्बन | iv) अणुभट्टी |

१) ii iii i iv २) iv i ii iii

३) iii iv i ii ४) iv ii iii i

२२. हायड्रोपावर प्लांटमध्ये .................

१) कायनेटिक एनर्जीचे विद्युत ऊर्जेत रूपांतर होते

२) विद्युत ऊर्जा पाण्यातून काढली जाते

३) पाण्याचे वाफेत रूपांतर करून विद्युत ऊर्जा तयार केली जाते

४) पोटॅन्शियल ऊर्जेचे रूपांतर विद्युत ऊर्जेत केले जाते

२३. वनस्पतींमध्ये गुरूत्वाच्या विरूध्द दिशेने पाण्याची हालचाल होते. याचे विशेष कारण काय ?

१) परासरण (Osmosis) २) बाष्पोच्छवास (Transpiration)

३) प्रकाशसंश्लेषण (Photosynthesis) ४) प्रसार/फैलाव (Diffusion)

२४. योग्य जोडया लावा

| सूची – I | सूची – II |
|---|---|
| १) कृतिमरित्या तयार केलेले पहिले मुलद्रव्य | i) द्रव्य $NH_3$ |
| २) कुलिंगसाठी रेफ्रिजरेटरमध्ये वापरले जाणारे रसायन | ii) टेक्नेटियम |
| ३) लाफिंग गॅस | iii) ॲल्यूमिनियम |
| ४) पृथ्वीच्या कठीण कवचामध्ये विपूल प्रमाणात आढळणारा धातू | iv) नायट्रस ऑक्साईड |

१) i iv iii ii

२) ii i iv iii

३) iv iii ii i

४) iii ii i iv

२५. खालीलपैकी कोणत्या सूक्ष्मजीवामूळे (Microbacteria) कॉलरा होतो ?

१) व्हिब्रीयो कोलेरी २) मायोबॅक्टेरियम टयुबरक्युलॉसिस

३) सालमोनेला टायफाई ४) प्लाझमोडियम व्हायवॅक्स

२६. खालीलपैकी हरितगृह (Greenhouse) वायूंचा समूह कोणता ?

१) $CO_2$, $SFS_S$, $CH_4$, $NO_2$ २) $CO_2$, $O_2$, N2, $NO_2$, $NH_3$

३) $CH_2$, $N_2$, $CO_2$, NH3 ४) $CFC_S$, $CO_2$, $NH_3$, $N_2$

www.spandancareers.org

२७. मच्छर पाण्यावर अंडी घालू शकतात. परंतु जेव्हा पाण्यावर तेलाचा थर टाकलेला असेत तेव्हा अंडी घालू शकत नाहीत कारण

१) पाण्याचा पृष्ठताण वाढतो २) पाण्याची श्यानता वाढते ३) पाण्याचा पृष्ठताण कमी होतो ४) यापैकी नाही

२८. विधान (A) : सामान्य दाबामध्ये वायू चागला विद्युतवाहक असतो

विधान (R) : वायूंच्या अणूंची गतीज ऊर्जा उच्च असते तसेच ते गतीमान असतात

१) A आणि R दोन्ही बरोबर असून A चे अचूक स्पष्टीकरण R करते

२) A आणि R दोन्ही बरोबर असून A चे अचूक स्पष्टीकरण R करत नाही

३) A बरोबर असून R चूक आहे

४) A चूक असून R बरोबर आहे

२९. खालील रोग विचारात घ्या

अ) कॉलरा ब) टी.बी. क) फायलेरिया ४) टायफॉईड

वरीलपैकी कोणत्या रोगाची निर्मिती जीवाणूमुळे (Bacteria) होते ?

१) अ आणि क २) ब आणि ड ३) अ, क आणि ड ४) अ, ब आणि ड

३०. सौर कुक्कर (Solar Cooker) बाबत योग्य पर्याय निवडा

अ) सौर कुकर हा प्लास्टिक किंवा तंतूकाच यासारख्या दुर्वाहक पदार्थापासून बनविला जातो

ब) बॉक्सच्या वरच्या बाजूस आरसा बसविलेला असतो. तो अशा पध्दतीने बसविलेला असतो की त्यामुळे सूर्यप्रकाश आतील भागत परावर्तीत होईल.

क) या पेटीमध्ये अन्न शिजविण्यासाठी धातू नलिका किंवा धातूचा डबा ठेवलेला असतो. त्यांना बाहेरील बाजूने काळा रंग दिलेला असतो

ड) या प्रकारचे कुक्कर मंद उष्मा वापरून शिजणारे पदार्थ शिजवण्यासाठी केला जातो. उदा तांदूळ, पालेभाज्या, डाळी, कडधान्ये इत्यादी

१) फक्त अ, ब, ड योग्य २) ब, क योग्य ३) अ, ब, क योग्य ४) वरील सर्व योग्य

३१. कोणते निळे, हिरवे शेवाळ वातावरणातील नत्र वायूचे स्थिरीकरण करते व भातशेतीची सुपिकता वाढवते ?

१) क्रुकॉकस २) ग्लीओकॅपसा ३) नॉसटॉक ४) केमीओसायफॉन

३२. योग्य जोडया लावा

| स्तंभ I (वनांचे प्रकार) | स्तंभ ii (वृक्ष) |
|---|---|
| १) सदाहरित | i) बाभूळ |
| २) पानझडी | ii) रबर |
| ३) काटेरी | iii) खारफुटी |
| ४) समुद्रकाठची | iv) साग |

१) i iv iii ii २) ii iii i iv

३) ii iv i iii ४) i ii iii iv

३३. खालीलपैकी कोणता किनारा भारताच्या पूर्व किनाऱ्याचा भाग आहे ?

१) कोकण किनारा २) मलबार किनारा ३) कोरोमंडल किनारा ४) दक्षिण किनारा

३४. कोरडवाहू फळझाडांचा खालील पर्यायामधून कोणता गट योग्य आहे तो निवडा

१) बोर, सीताफळ, चिंच, काजू, कोकम २) बोर, सीताफळ, पपई, करवंद

३) सीताफळ, चिंच, आंबा, केळी ४) चिंच, आंबा, बोर, चिक्कू

३५. खतनिर्मितीसाठी उपयोगी पडणारा फॉस्फेट कोठे आढळतो ?

१) ललितपूर २) भरतपूर ३) नागपूर ४) इंदौर

३६. खालीलपैकी कोणता राष्ट्रीय महामार्ग महाराष्ट्र राज्यात सुरू होऊन महाराष्ट्र राज्यातच संपतो ?

१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६ २) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७

३) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० ४) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४३

३७. जोडया लावा

| राज्य | व्याघ्र प्रकल्प |
|---|---|
| १) कर्नाटक | i) कान्हा |
| २) छत्तीसगड | ii) दुधवा |
| ३) उत्तरप्रदेश | iii) इंद्रावती |
| ४) मध्यप्रदेश | iv) बांदिपूर |

१) iv iii ii i

२) iii iv ii i

३) i ii iii iv

४) ii i iv iii

www.spandancareers.org

३८. योग्य जोडया जुळवा

| राज्य | लिंगगुणोत्तर (दर हजारी) २०११ |
|---|---|
| १) पंजाब | i) ९५४ |
| २) महाराष्ट्र | ii) ९३० |
| ३) मध्यप्रदेश | iii) ९२५ |
| ४) आसाम | iv) ८९३ |

१) i ii iii iv  २) ii iii iv i
३) iii iv i ii  ४) iv iii ii i

३९. जायकवाडी 'मत्स्य बीज' केंद्र खालीलपैकी कोणत्या जिल्हयात आहे ?
१) परभणी २) लातूर ३) भंडारा ४) औरंगाबाद

४०. योग्य जोडया लावा

| स्तंभ – i (धरण) | स्तंभ – ii (जलाशयाचे नाव) |
|---|---|
| १) कोयना | i) शहाजी सागर |
| २) भाटघर | ii) शिवसागर |
| ३) माणिकडोह | iii) ऑर्थर सरोवर |
| ४) भंडारदरा | iv) येसाजी कंक |

१) i iv ii iii  २) i ii iii iv
३) iv iii ii i  ४) ii iv i iii

४१. महाराष्ट्रातील मोसमी वनातील वृक्षाची पाने उन्हाळयात गळून पडतात कारण
१) उन्हाळयात पाऊस पडत नाही  २) उन्हाळयात तापमान जास्त असते
३) उन्हाळयात हवामान विषम असते  ४) बाष्पीभवन कमी करण्यास्तव

४२. महाराष्ट्रमध्ये खालीलपैकी कोणती नदी पश्चिम वाहिनी नाही ?
१) वशिष्ठी २) तापी ३) भीमा ४) उल्हास

४३. खालील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा
अ) गोदावरी नदी परभणी शहराच्या दक्षिणेकडे आहे  ब) पूर्णा ही गोदावरी नदीची उपनदी नाही
क) हरिशचंद्रगडाची उंची १४०४ मी. आहे
१) फक्त विधान अ योग्य आहे  २) फक्त विधान ब योग्य आहे
३) विधाने अ आणि ब योग्य आहेत  ४) विधान ब आणि क योग्य आहेत

४४. महाराष्ट्राची मृदा व हवामान फळांच्या वाढीसाठी पोषक असल्याने अनेक प्रकारच्या फळांचे उत्पादन केले जाते
अ) सिंधुदुर्ग जिल्हयात सर्वात जास्त जागेत फळांचे उत्पादन घेतले जाते
ब) महाराष्ट्रात भारताच्या एकूण केळी उत्पादनाच्या २०% उत्पादन होते
क) लातूर जिल्हयात द्राक्षाचे उत्पादन होत नाही
१) विधान अ आणि विधान ब योग्य आहेत  २) विधान अ आणि विधान क योग्य आहेत
३) विधान ब आणि विधान क योग्य आहेत  ४) विधाने अ, ब आणि विधान क योग्य आहेत

४५. महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेप्रमाणे कमी साक्षरतेचे शेवटचे दोन जिल्हे कोणते आहेत ?
१) गडचिरोली आणि धळे  २) धुळे आणि नंदूरबार
३) हिंगोली आणि धुळे  ४) नंदुरबार आणि गडचिरोली

४६. महाराष्ट्रातील खालील जिल्हयांपैकी कोणत्या एका जिल्हयात 'पडीक जमिनीखालचे क्षेत्र' सर्वात अधिक आहे ?
१) सांगली २) पुणे ३) सोलापूर ४) अहमदनगर

४७. योग्य जोडया लावा

| यादी – i (घाट) | यादी – ii (मार्ग) |
|---|---|
| १) फोंडा घाट | i) कोल्हापूर – रत्नागिरी |
| २) दिवा घाट | ii) पुणे – बारामती |
| ३) आंबा घाट | iii) पुणे – सातारा |
| ४) खंबाटकी घाट | iv) कोल्हापूर – पणजी |

१) iii ii i iv
२) iv ii i iii
३) iv i ii iii
४) iii ii iv i

www.spandancareers.org

४८. खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा
अ) वि.रा.शिंदे यानी मुंबई येथे देवदासी प्रथेविरूध्द परिषद भरविली
ब) पेरियार रामास्वामी नायकर यांनी दक्षिण भारतात देवदासी प्रथेला कडाडून विरोध केला
क) म. फुलेंनी अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली
ड) बालहत्या प्रतिबंधक गृह महर्षी कर्वेनी चालू केली
१) विधान अ व ब अयोग्य २) विधान क व ड अयोग्य
३) विधान ब व ड अयोग्य ४) फक्त ड अयोग्य

४९. काँग्रेस अधिवेशनाचे पहिले युरोपीयन अध्यक्ष कोण होते ?
१) आल्फ्रेड वेब २) जॉर्ज युल ३) लॉर्ड वेडनबर्ग ४) लॉर्ड रिपन

५०. 'भारत सेवक समाजाची' स्थापना कोणी केली ?
१) दादोबा तर्खडकर २) नामदार गोखले ३) लो. टिळक ४) गो.ग.आगरकर

५१. स्वातंत्र चळवळीत संवैधानिक व शांततेच्या मार्गाचा पुरस्कार करणारा व राजपदाप्रती निष्ठा असलेली राष्ट्रीय सभेतील गट कोणता ?
१) गो.कृ.गोखले, दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता २) अरविंद घोष, लो. टिळक, बिपीनचंद्र पाल
३) गो.कृ.गोखले, लो. टिळक, वि.दा.सावरकर ४) वि.दा.सावरकर, न्या.रानडे, अनंत कान्हेरे

५२. सिराज उद्दौला व इंग्रज याच्यातील संघर्षाचे खालीलपैकी कोणते परिणाम झाले ?
अ) मीर कासीमला बंगालचे नवाबपद ब) मीर जाफरला बंगालचे नवाबपद
क) बक्सारची लढाई ड) अलाहाबादचा तह
१) वरील सर्व २) विधान ब ३) विधान अ, ब, क ४) वरीलपैकी नाही

५३. 'स्त्री – पुरूष समानतेचा पुरस्कार करणारे समाजसुधारक खालीलपैकी कोण आहेत
अ) गोपाळ हरी देशमुख ब) ईश्वरचंद्र विद्यासागर
क) आनंदीबाई जोशी ड) मादाम भिकाजी कामा
१) विधान अ, क २) विधान अ, क, ड ३) विधान अ, ब, क ४) विधान अ, ब, ड

५४. मुस्लीम लिंग विषयी योग्य विधाने निवडा
अ) आगाखान यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ लॉर्ड मिंटो यांना भेटले
ब) मिंटोच्या पुढाकाराने १९०६ मध्ये मुस्लीम लिगची स्थापना झाली
क) मुस्लीम लिग मध्ये आगाखान, नवाब सलील उल्ला यांचे वर्चस्व होते
ड) मुस्लीम लिगने काँग्रेसचे वर्चस्व वाढविले
१) विधान अ, क, ड २) विधान अ, ब, क योग्य ३) विधान अ व ब योग्य ४) विधान अ, ब, क, ड योग्य

५५. बाळशास्त्री जांभेकरांबाबत अयोग्य विधान ओळखा
अ) त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यातील पोंभर्ले येथे ६ जानेवारी १८१२ रोजी झाला
ब) बॉम्बे नेटिव्ह एज्यूकेशन सोसायटीमध्ये डेप्यूटी सेक्रेटरी या महत्वाच्या पदावर कार्यरत
क) मुंबई इलाख्यातील प्राथमिक शाळा तपासणीसाठी निरीक्षक
ड) त्यांनी शून्यलब्धी, हिंदुस्तानचा इतिहास, हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास, सार संग्रह, इंग्लंडचा इतिहास हे ग्रंथ लिहिले
१) विधान अ, ब, क अयोग्य २) विधान ड, क, ब अयोग्य
३) वरील सर्व अयोग्य ४) यापैकी नाही

५६. १९३५ च्या कायद्याविषयी योग्य विधाने सांगा
अ) या कायद्याने भारतात ब्रिटिश शासित प्रांत व संस्थाने यांचे मिळून संघराज्य स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली
ब) ब्रिटिश शासित प्रदेशाचा कारभार भारतीय प्रतिनिधीच्या हाती सोपविण्यात येणार होता
क) संस्थानिकांनी संघराज्यात सामिल होण्यास संमती दिली
ड) या कायद्यातील संघराज्याची योजना अंमलात आली नाही
१) विधान अ, ब, क योग्य २) विधान अ, ब, क, ड योग्य
३) विधान अ, क व ड योग्य ४) विधान अ, ब, ड योग्य

५७. खालीलपैकी वासुदेव फडकेंबाबत अयोग्य विधान ओळखा
१) जिल्हा न्यायालयात अल्फ्रेड केसर याच्यासमोर खटला चालला
२) इंग्रजांविरूध्द युध्द पुकारल्याचा आरोप करून तो खटला सत्र न्यायाधीश न्युनहॅमकडे वर्ग करण्यात आला
३) उच्च न्यायालयात वासुदेव फडकेंच्या बचावाचे काम महादेव चिमाजी आपटे यांनी केले
४) वासुदेव बळवंत फडकेंना फाशीची शिक्षा सुनावली गेली

५८. होमरूळ चळवळीसाठी पुढीलपैकी कोणत्या संघटना एकत्र आल्या होत्या ?
अ) मुस्लीम लिग ब) होमरूल लिग क) काँग्रेस ड) स्वराज्यपक्ष
१) विधान अ, ब, क २) विधान ब, क, ड ३) विधान अ, क, ड ४) विधान अ, ब, ड

www.spandancareers.org

५९. ‘शेतकरी चळवळी विषयी’ समर्पक विधाने निवडा

अ) ‘दिनबंधू मित्र’ यांच्या निलदर्पन या नाटकाने नीळ उत्पादक शेतकऱ्यांच्या हलाखीचे दर्शन घडविले

ब) बाबा रामचंद्र यांच्या पुढाकाराने १९१८ साली उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांची ‘किसान सभा’ स्थापन केली

क) केरळमध्ये मोपला शेतकऱ्यांनी मोठा उठाव केला

ड) १९३६ साली प्रा.एन.जी.रंगा यांनी ‘अखिल भारतीय किसान सभा’ स्थापन केली

१) अ, ब, क, ड योग्य    २) विधान अ, ब, क योग्य

३) विधान ब, क, ड योग्य    ४) विधान अ, क, ड योग्य

---

६०. सायमन कमिशनच्या अहवालावर विचार करण्यासाठी बोलविलेल्या गोलमेज परिषदांचे अध्यक्ष कोण होते ?

१) ब्रिटनचा युवराज    २) ब्रिटिश पंतप्रधान    ३) ब्रिटनशी राणी    ४) भारताचे व्हाईसरॉय

---

६१. योग्य जोडया लावा

१) आर्यसमाज    i) महात्मा ज्योतिबा फुले

२) प्रार्थना समाज    ii) स्वामी दयानंद सरस्वती

३) सत्यशोधक समाज    iii) दादोबा पांडुरंग तर्खडकर

४) परमहंसभा    iv) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

१) i iii iv ii    २) ii iv i iii

३) ii iv iii i    ४) iv ii i iii

---

६२. जोडया जुळवा

अ गट    ब गट

१) लॉर्ड बेंटीग    i) पेढाऱ्याचा बंदोबस्त

२) लॉर्ड हेस्टींग    ii) पुरातत्व कायदा

३) लॉर्ड कर्झन    iii) ठगांचा बंदोबस्त

४) लॉर्ड लिटन    iv) व्हर्नाकुलर प्रेस ॲक्ट

१) i ii iii iv    २) iii i ii iv

३) iv iii ii I    ४) iii iv ii i

---

६३. महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था केव्हापासून अंमलात आली ?

१) १ मे १९६०    २) १ मे १९६२    ३) २६ जानेवारी १९५०    ४) २६ नोव्हेंबर १९४९

---

६४. स्वातंत्र्याचा हक्क राज्यघटनेत कोणत्या अनुच्छेदात नमूद करण्यात आला आहे ?

१) अनुच्छेद – २५    २) अनुच्छेद – १२    ३) अनुच्छेद – १८    ४) अनुच्छेद – १९

---

६५. राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या सदस्यांचा पात्रतेसंदर्भात अंतिम निर्णय कोण घेतात ?

१) विधानसभा अध्यक्ष    २) राज्यपाल    ३) विधानपरिषद सभापती    ४) मुख्यमंत्री

---

६६. राज्य मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षांचा कार्यकाळ पदभार स्वीकारल्यापासून .................... वर्षे किंवा वयाची ....... .......... वर्षे जे आधी पूर्ण होईल तो

१) १०,७०    २) ६,६५    ३) ५,६०    ४) ५,७०

---

६७. जोडया लावा

१) संसदीय शासन पध्दती    i) अमेरिका व ऑस्ट्रेलिया

२) संघराज्य कल्पना    ii) आयर्लंड

३) मूलभूत हक्क    iii) ग्रेट ब्रिटन

४) नीतिनिर्देशक तत्वे    iv) अमेरिका

१) i ii iii iv    २) iv ii iii i

३) iii i iv ii    ४) ii iii iv i

---

६८. ‘लोकपाल’ ही संकल्पना सर्वप्रथम स्वीकारणारा देश पुढीलप्रमाणे आहे

१) युनायटेड किंगडम    २) कॅनडा    ३) फ्रान्स    ४) स्विडन

---

६९. राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष वयाची किती वर्षे पूर्ण होईपर्यंत आपल्या पदावर राहू शकतो ?

१) ६५ वर्षे    २) ६० वर्षे    ३) ६२ वर्षे    ४) यापैकी नाही

---

७०. जिल्हा परिषदेची शिक्षणविषयक प्रमुख कामाविषयी योग्य पर्याय निवडा

अ) जिल्हयातील प्राथमिक शिक्षणाची योजना करणे. नवीन शाळा स्थापन करून शिक्षणाचा प्रसार करणे

ब) प्राथमिक शाळांना इमारती शैक्षणिक साहित्य, सुविधा व सोई उपलब्ध करून देणे

क) शाळेसाठी आवश्यक असलेला अध्यापक वर्गाची नेमणूक करून कामाचे तास व सुट्टया निश्चित करणे

ड) जिल्हा स्तरावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे

१) फक्त अ योग्य    २) विधान अ, ब आणि क योग्य

३) विधान ब व ड योग्य    ४) विधान अ आणि ब योग्य

---

www.spandancareers.org

७१. पंचायत राज स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थापना सर्वप्रथम ................. व त्यानंतर ................. या राज्यात झाली.
१) राजस्थान आणि मध्यप्रदेश २) आंध्रप्रदेश आणि पश्चिम बंगाल
३) राजस्थान आणि आंध्रप्रदेश ४) आंध्रप्रदेश आणि राजस्थान

७२. ग्रामसभेसंबंधीच्या खालील विधानांतून योग्य पर्याय निवडा
अ) तो पंचायती राज्यातील सर्वात कनिष्ठ स्तर आहे
ब) ७३ व्या राज्य घटना दुरूस्तीने तिला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे
क) ग्रामसभेत, ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात घटनादुरूस्तीने वास्तव्य करणाऱ्या सर्व पात्र मतदारांचा समावेश होतो
ड) वित्तीय वर्षामध्ये ग्रामसभेच्या चार बैठका घ्याव्या लागतात
वरीलपैकी कोणते / कोणती विधाने बरोबर आहेत ?
१) फक्त अ योग्य २) फक्त ब आणि क योग्य ३) फक्त अ, ब, क योग्य ४) वरील सर्व योग्य

७३. लोकायुक्ताबाबत योग्य विधाने ओळखा
अ) लोकायुक्त पदाची निर्मिती करणारे पहिले राज्य महाराष्ट्र होय
ब) महाराष्ट्राने १९७१ मध्ये हे पद संमत केले
क) लोकायुक्तांची नेमणूक राज्यपाल करतात
ड) त्यांचा कार्यकाळ ५ वर्षे असतो
१) फक्त अ आणि ब योग्य २) फक्त अ आणि क योग्य
३) फक्त ब आणि ड योग्य ४) वरील सर्व योग्य

७४. खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा
अ) पंचायत समिती बरखास्त झाल्यापासून ६ महिन्याच्या आत निवडणूका घ्याव्या लागतात
ब) सभापती आपला राजीनामा जिल्हा परिषदेच्या सदस्याकडे देतात
क) पंचायत समिती सभापती / उपसभापती यांच्या अविश्वासाच्या ठरावासाठी १/४ लेखी तक्रार जिल्हा अधिकाऱ्याकडे करावी लागते
ड) बरखास्त झाल्यावर १ वर्ष निवडणुका घेता येत नाही
१) अ, क, ड अयोग्य २) ब, क, ड अयोग्य ३) अ, क अयोग्य ४) ब, ड अयोग्य

७५. खालीलपैकी योग्य विधाने ओळखा
अ) नगरपालिकेच्या अध्यक्षास नगराध्यक्ष असे म्हणत नाही
ब) नगराचा अध्यक्ष प्रथम नागरिक असतो
क) नगराध्यक्षाला राजीनामा जिल्हाधिकाऱ्याकडे द्यावा लागतो
ड) नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष हे पदाधिकारी असतात
१) अ, क योग्य २) अ, ब योग्य ३) ब, क योग्य ४) क, ड योग्य

७६. बी.डी.ओ. च्या कार्याबद्दल अयोग्य विधाने ओळखा
अ) कागदपत्रे सांभाळणे
ब) कर्मचाऱ्यावर हुकूम गाजविणे
क) पंचायत समिती ठरावाची नोंद घेणे व अंमलबजावणी करणे
ड) जिल्हा पातळीवरचा शासनाचा प्रतिनिधी म्हणून कार्ये करणे
इ) सभापती व सरपंचाना कायदेशीर सल्ला देणे
फ) अर्थसंकल्प तयार करणे
१) अ, क ड अयोग्य २) ब, क, इ अयोग्य
३) ड, इ, फ अयोग्य ४) क, ड, इ अयोग्य

७७. विधान A : महापौराला शहराचा प्रथम नागरिक संबोधतात
कारण R : महापौर हा महानगरपालिकेचा कार्यकारी प्रमुख असतो
१) विधान A योग्य व कारण R अयोग्य
२) विधान A अयोग्य व कारण R योग्य
३) विधान A व कारण R दोन्ही योग्य परंतु A चे R योग्य कारण नाही
४) विधान A व कारण R दोन्ही अयोग्य

७८. अखिल भारतीय दारिद्रय रेषेचे विभक्तीकरण करून प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र दारिद्रय रेषा, तसेच राज्य ग्रामीण दारिद्रय रेषा व राज्य शहरी दारिद्रय रेषा अशी विभागणी कोणत्या समितीने केली ?
१) तेंडुलकर समिती २) रंगराजन समिती ३) लकडावाला तज्ज्ञगट ४) नियोजन आयोग कार्यगट

७९. 'अटल निवृत्तीवेतन योजने' संदर्भात खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा
अ) या किमान हमीभूत निवृत्ती वेतन (minimum guaranteed Pension) योजनेचे मुख्य लक्ष्य असंघटित क्षेत्रातील श्रमिक आहेत
ब) कुटुंबातील केवळ एकच सदस्य योजनेत सहभागी होऊ शकतो

www.spandancareers.org

क) योजनेत सहभागी व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्याएवढेच निवृत्तीवेतन तिच्या जोडीदारास (Spouse) मिळण्याची हमी आहे

१) फक्त अ योग्य २) फक्त ब व क योग्य ३) फक्त अ व क योग्य ४) अ, ब, क योग्य

८०. ग्लोबल करप्शन बॅरोमीटरच्या अहवालानुसार भारतात लाचखोरीचे प्रमाण किती टक्के आहे ?

१) ३०% २) ३५% ३) ३९% ४) ४२%

८१. संयुक्त राष्ट्र आमसभेने व्यापार आणि विकास या विषयावर संयुक्त राष्ट्राच्या परिषदेच्या (अंकटाड) अध्यक्षपदावर कोणाची नेमणूक केली आहे

१) निशा मल्होत्रा २) पुनम गुप्ता ३) रेबेला ग्रिनस्पॅन ४) ॲनी जॉर्ज

८२. इटालियन खुली टेनिस स्पर्धा २०२१ महिला एकेरी स्पर्धेची विजेती कोण ?

१) लॉरेल हबर्ड २) इगा स्विटेक ३) ॲरले बार्टी ४) सेरेना विलीप

८३. दिव्यागांसाठी देशातील पहिले क्रीडा केंद्र कुठे स्थापन केले जाणार आहे ?

१) जयपूर २) हैद्राबाद ३) पुणे ४) अहमदाबाद

८४. ५१ वा दादासाहेब फाळके पुरस्कार – २०१९ कुणाला देण्यात आला ?

१) रजनीकांत २) मनोज वाजपेयी ३) अनिल कपूर ४) श्रीदेवी

८५. अलीकडे संयुक्त राष्ट्रे सुरक्षा परिषदेवर (UNSC) भारताची निवड झाली आहे. त्यासंबंधी अयोग्य विधान शोधा ?

अ) UNSC हे संयुक्त राष्ट्रांचे एकमेव अंग आहे ज्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक आहे

ब) संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेव्दारे दोन तृतीयांश बहुमताने UNSC चे सर्व सदस्य निवडले जातात

क) भारत ८ व्यांदा UNSC चा सदस्य बनला आहे

पर्याय

१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) एकही नाही

८६. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निवडणुकासंबंधी खालीलपैकी अयोग्य विधाने दर्शवणारा योग्य पर्याय निवडा ?

अ) अमेरिकेचा राष्ट्रध्यक्षाला प्रत्येकी ४ वर्षाचे २ कार्यकाळ मिळू शकतात

ब) डेमोक्रेटिक पक्षाचे जो बिडेन हे अमेरिकेचे ४६ व राष्ट्रध्यक्ष ठरले आहेत

क) अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षांची चिन्हे अनुक्रमे गाढव आणि हत्ती आहेत

१) अ व ब २) फक्त ब ३) अ, ब, क ४) वरीलपैकी एकही नाही

८७. युएसएच्या राज्यघटनेनुसार राष्ट्रध्यक्ष पदासाठीची पात्रता न दर्शवणारा पर्याय ओळखा?

१) युनायटेड स्टेटसची नैसर्गिकरित्या जन्मलेली नागरिक व्यक्ती

२) किमान वय ३५ वर्षे

३) मनाने आणि शरीराने निरोगी (healthy in mind and body)

४) युनायटेड स्टेटसमध्ये किमान १४ वर्षे रहिवासी

८८. खालीलपैकी कोणता / ते देश जिबूती आचार संहिता कराराचा/चे निरीक्षक आहे/त ?

अ) जापान ब) भारत क) नॉर्वे ड) ब्रिटन

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ २) फक्त ड ३) अ, क, ड ४) अ, ब, क, ड

८९. खालीलपैकी कोणते देश अलीकडेच स्वाक्षरी झालेल्या 'अब्राहम अकॉर्ड'शी (Abraham Accord) संबंधित आहे

अ) भारत ब) युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका क) बहारीन

ड) युएई इ) इस्रायल ई) सौदी अरेबिया

पर्यायी उत्तरे

१) वरीलपैकी सर्व २) क, ड, इ, ई ३) ब, क, ड, इ ४) ब, क, ड, इ, ई

९०. इस्रायलच्या 'हवाई संरक्षण यंत्रणे'चे नाव काय आहे ?

१) S-400 Triumf २) Iron Dome

३) Air Defence Dome ४) THAAD

९१. ओबीसी उपवर्गीकरणाबाबत योग्य पर्याय शोधा

अ) राज्यघटनेतील अनुच्छेद ३३० अंतर्गत २ ऑक्टोंबर २०१७ रोजी ओबीसी उपवर्गीकरण आयोग स्थापन करण्यात आला

ब) न्या.जी.रोहिणी या ओबीसी उपवर्गीकरण आयोगाच्या अध्यक्ष आहेत

क) या आयोगाने जुलै २०२१ मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ, ब बरोबर २) फक्त ब बरोबर ३) सर्व चूक ४) सर्व बरोबर

www.spandancareers.org

९२. खालील अयोग्य जोडी ओळखा ?
अ) लिली थॉमस विरुध्द भारत सरकार २०१३: दोषी खासदार किंवा आमदार पदावर राहू शकणार नाहीत
ब) पीपल्स युनियन फॉर लिबर्टीज विरुध्द भारत सरकार २०१३: नोटा पर्याय प्रदान करा
क) लोक प्रहरी विरुध्द भारत सरकार २०१८: उमेदवारांनी त्यांचे आश्रितांच्या उत्पन्नाचे स्त्रोत जाहीर करा
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) एकही नाही

९३. १०४ व्या घटनादुरुस्तीबाबत खालीलपैकी अयोग्य विधाने दर्शवणारा योग्य पर्याय निवडा
अ) १२६ व्या घटनादुरुस्ती विधेयकाविरोधात दोन्ही लोकसभा आणि राज्यसभेमध्ये एकही मत पडले नाही
ब) लोकसभा आणि विधानसभेतील SC व ST साठीचे आरक्षण राज्यघटना लागू झाल्यापासून ८० वर्षापर्यंत कायम राहील अशी दुरुस्ती या घटनादुरुस्तीव्दारे अनुच्छेद ३४४ मध्ये करण्यात आली आहे
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) दोन्ही अ व ब नाही

९४. खालीलपैकी योग्य विधाने दर्शवणारा पर्याय निवडा
अ) महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींच्या आरक्षणासाठी ५०% आरक्षण मर्यादा ओलांडण्यास सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२१ मध्ये मान्यता दिली.
ब) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अंतर्गत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांमध्ये ओबीसींसाठी २७% आरक्षण देण्याची तरतूद आहे
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) दोन्ही अ व ब नाही

९५. खालीलपैकी योग्य विधाने दर्शवणारा पर्याय निवडा
अ) १५ सप्टेंबर २०२१ रोजी संसद टीव्हीचे उदघाटन झाले
ब) रवी शर्मा हे या टीव्हीचे सीईओ आहेत
क) राज्यसभा व विधानसभा टीव्ही चॅनेलसच्या एकत्रीकरणातून संसद टीव्ही स्थापन करण्यात आली आहे
१) फक्त अ २) फक्त अ, ब ३) फक्त ब ४) वरीलपैकी सर्व

९६. अलीकडे नियुक्त झालेल्या मुख्यमंत्र्यांबाबत खालीलपैकी बरोबर विधाने ओळखा ?
अ) नितीश कुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रीपदी ६ व्यांदा शपथ घेतली
ब) पिनारायी विजयन हे पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करुन केरळच्या मुख्यमंत्रीपदावर येणारे पहिलेच मुख्यमंत्री ठरले
क) ४५ वर्षीय पुष्कर सिंग धामी हे हिमाचल प्रदेशचे सर्वात युवा मुख्यमंत्री ठरले आहेत
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) अ, ब, क

९७. अलीकडे केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयाने उमेदवारांच्या निवडणूक प्रचार खर्चाच्या मर्यादेमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अयोग्य विधान शोधा ?
अ) लोकसभा निवडणूकांसाठी प्रचार खर्चाची मर्यादा ८० लाख रुपये आहे
ब) विधानसभा निवडणूकांसाठी ही खर्च मर्यादा २० लाख ते ३० लाख रुपयांच्या दरम्यान आहे
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ आणि ब ४) एकही नाही

९८. आतापर्यंत कोणत्या साली भारताचा प्रजासत्ताक दिन सोहळा विदेशी पाहुण्यांशिवाय पार पडला ?
अ) १९५२ ब) १९५३ क) १९६५
ड) १९६६ इ) १९७१ ई) २०२१
१) अ, ब, क, इ, ई २) ब, ड, इ, ई ३) अ, ब, ड, ई ४) अ, ब, क, ड, इ, ई

९९. सेन्ट्रल व्हिस्ता प्रकल्पाबाबत खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा ?
अ) कमळ : राज्यसभा
ब) मोर : लोकसभा
क) वटवृक्ष : सेन्ट्रल लाऊंजे
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) एकही नाही

१००. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा ?
अ) गैरसैन : उत्तराखंड
ब) विजयनगर : आसाम
क) मलेरकोटला : पंजाब
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) एकही नाही

www.spandancareers.org